**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.१३/०४/२०२६

*मा.महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय विभागांची संयुक्त बैठक संपन्न ;*
*मान्सूनपूर्व सर्वंकष तयारीचा घेतला आढावा*

मा.महापौर श्री.अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३ एप्रिल २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयात मान्सूनपूर्व सर्वंकष तयारीसंदर्भात विविध शासकीय विभागांसोबत महत्त्वपूर्ण संयुक्त आढावा बैठक पार पडली. पावसाळ्याच्या काळात उद्भवणाऱ्या संभाव्य पूरस्थिती, जलसंचय, वाहतूक कोंडी तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना यावर या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी सर्व संबंधित यंत्रणांनी आपापल्या स्तरावर केलेल्या तयारीचा आढावा तसेच येणाऱ्या अडचणी सादर केल्या. बैठकीत सर्व विभागांनी समन्वय वाढवण्यावर विशेष भर देण्यात आला.

बैठकीच्या सुरुवातीस अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांनी प्रास्ताविक सादर करीत बैठकीच्या प्रयोजनासंदर्भात व त्यामधील विषयांसंदर्भात थोडक्यात माहिती दिली. यानंतर पालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.रोहन मोरे यांनी महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालीन विभागामार्फत करण्यात आलेल्या व येणाऱ्या उपाययोजना, विभागाकडे असलेली यंत्रसामुग्री, पूर परिस्थितीत बचाव कार्य करणेसाठी असलेली तयारी, महानगरपालिका क्षेत्रातील दरड प्रवण क्षेत्र, सखल भाग, कार्यरत व आवश्यक कर्मचारी, नागरिकांसाठी देत असलेल्या सुविधा इ.बाबत सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे दिली. आपत्कालीन परिस्थितीत ऐनवेळेला गैरसोय होऊ नये यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने त्यांच्याकडे असलेल्या अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची पावसाळ्यापूर्वी योग्य ती तपासणी करून घ्यावयाची सूचना यावेळी मा.महापौर महोदयांनी केली. तसेच पावसाळ्यात धोकादायक वृक्षांच्या फांद्या कोसळण्याच्या बऱ्याचशा घटना घडतात, यासाठी लवकरात लवकर वृक्ष छाटणी करून घेणे, धोकादायक इमारती निष्कासन, तसेच आपत्कालीन स्थितीत नागरिकांना तात्पुरत्या निवारा केंद्राची व्यवस्था करणेच्या सूचनाही मा.महापौर महोदयांनी विभागाला दिल्या. पावसाळ्यात धरणाच्या पाणी सोडल्यामुळे पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी पावसाळ्यात धरणातील पाणी योग्यरीत्या सोडण्याचे नियोजन करण्याच्या व तसेच महानगरपालिका कार्यालयास आगाऊ कळविण्याच्या सूचनाही यावेळी महापौर महोदयांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीस उपस्थितीत NHAI च्या अधिकाऱ्यांनी महामार्गावर पूरपरिस्थिती उद्भवू नये यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती यावेळी सादर केली. महामार्गांवरील जलनिस्सारण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी नाले व ड्रेनेज लाईनची स्वच्छता, अडथळे दूर करणे तसेच संवेदनशील ठिकाणी विशेष लक्ष देण्याचे काम सुरू असल्याची माहिती दिली. त्याचप्रमाणे उपस्थित महसूल विभाग, पोलीस प्रशासन, वाहतूक पोलीस, रेल्वे विभाग, खारलॅण्ड विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एन डी आर एफ चे अधिकारी यांनी आपल्या विभागाशी संबंधित मान्सूनपूर्व तयारीविषयी माहिती सादर केली.

बैठकीत महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या राडारोड्यासंबंधी ठोस उपाययोजना करणे बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच जलमार्गामधील तसेच नाले, गटारे इ.मधील गाळ साफ करणे, रेल्वे जवळील पाण्याचा निचरा योग्यरित्या होईल याबबत उपाययोजना करणे इ.बाबत सविस्तर चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना करणेच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

बैठकीत विविध विभागांना भेडसावणाऱ्या अडचणींवरही चर्चा करण्यात आली. यामध्ये निधीची उपलब्धता, मनुष्यबळाची कमतरता, तांत्रिक अडचणी तसेच विभागांमधील समन्वयाचा अभाव या मुद्द्यांवर सविस्तर विचारविनिमय झाला. यावर उपाय म्हणून सर्व विभागांनी एकत्रित समन्वय यंत्रणा ठरविण्यात आले.
मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना मान्सून पूर्व तयारी संदर्भात विविध सूचना दिल्या. पावसाळी कालावधीत नागरिकांच्या सुविधेसाठी सर्व शासकीय विभागांचे मिळून २४ तास कार्यरत असणारे एक संयुक्त नियंत्रण कक्ष स्थापन करणेचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांना मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने धोकादायक इमारतींचे निष्कासन करणे, धोकादायक वृक्ष छाटणीची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच आपत्कालीन परिस्थितीत प्रभाग निहाय करण्यात आलेल्या व करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावा प्रत्यक्ष जाऊन घेणार असल्याचे मा.आयुक्त महोदयांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीत उपस्थित मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.स्थायी समिती सभापती श्री.प्रवीण शेट्टी, मा.सभागृह नेते श्री.प्रफुल्ल साने, मा.विरोधी पक्षनेते श्री.मनोज पाटील, उपस्थित मा.नगरसेवक श्री.कन्हैय्या भोईर, मा.नगरसेवक श्री.अशोक शेळके यांनीही आपल्या विविध सूचना यावेळी संबंधित विभागांना दिल्या.
मा. महापौर महोदयांनी सर्व विभागांना निर्देश देताना सांगितले की, मान्सूनपूर्व सर्व कामे निश्चित वेळेत पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवाव्यात. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये याची खबरदारी घ्यावी.

बैठकीची सांगता अतिरिक्त आयुक्त श्री.दिपक सावंत यांनी उपस्थितांचे आभार मानून केली. बैठकीस उपस्थित मान्यवरांनी दिलेल्या निर्देशांचे पालन सर्व विभागांनी करावे व आपली आपत्कालीन व्यवस्था अधिक बळकट करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.
या बैठकीस महानगरपालिकेचे सर्व उप-आयुक्त, प्रांत अधिकारी, तहसीलदार वसई, पोलीस विभाग, वाहतूक पोलीस, एनडीआरएफ (NDRF), सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे प्रशासन, खारलॅण्ड विभाग, पाटबंधारे विभाग, NHAI विभाग तसेच इतर शासकीय विभागांचे व महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते